गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १९७ वा ● गुरुवार ०७ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 197 | Date : 07/12/2023 | blow :Thursday | Page 4 | Price 4




## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाणदिनी चैत्यभूमी येथे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे अभिवादन

मुंबई : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पचक्र अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

दादर येथील चैत्यभूमी येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार राहुल शेवाळे, आमदार आशिष शेलार, प्रवीण दरेकर, कालिदास कोळंबकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर, माजी खासदार नरेंद्र जाधव, मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल, भिक्खू महासंघाचे अध्यक्ष डॉ. भदन्त राहुल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे, सरचिटणीस नागसेन कांबळे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. महापरिनिर्वाण दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिका जनसंपर्क विभागामार्फत आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी भेट दिली. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुंबई महापालिकेतर्फे प्रकाशित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जागतिक पाऊलखुणा' ही माहिती पुस्तिका मान्यवरांना भेट देण्यात आली.



## हिवाळी अधिवेशनात विदर्भ, मराठवाड्याच्या प्रश्नांसह विविध प्रश्नांना न्याय देणार : मुख्यमंत्री

### कायद्याच्या चौकटीत बसणारे व टिकणारे आरक्षण देणार

नागपूर : नागपूरमधील हिवाळी अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह शेतकरी, कष्टकरी यांच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करून न्याय देण्याचा प्रयत्न आहे. कायद्यात बसेल व टिकेल आणि ओबीसीसह कोणत्याही घटकांवर अन्याय होणार नाही, असे मराठा आरक्षण देण्याचा या शासनाचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

नागपूर येथे उद्या, दि. ७ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशनास सुरूवात होत आहे. यापार्श्र्वभूमीवर आज मुख्यमंत्री महोदयांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेस मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत दादा पाटील, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे,कामगार मंत्री सुरेश खाडे, कौशल्य



विकास, नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, ड. आशिष जायस्वाल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, विदर्भामध्ये हे हिवाळी अधिवेशन होत आहे. विदर्भाशी आमचे जिव्हाळ्याचे एक नातं आहे. विदर्भातील जनतेला ही अधिवेशनामधून न्याय देताना एक विशेष आनंदही होत आहे. विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस आणि कालबद्ध रितीने जे प्रकल्प, योजनांचे निर्णय घेतले आहेत, ते पूर्ण केले जातील. गेल्या दीड वर्षाच्या काळामध्ये सर्वसामान्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून समाजातल्या प्रत्येक घटकापर्यंत विकास कामे पोहोचण्याचे काम हे सरकार करत आहे.

शासन आपल्या दारी या उपक्रमात काल बीडमध्ये ७० ते ८० हजार लोक उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यात सुमारे २ कोटी नागरिकांनी लाभ घेतला आहे. जिल्हाधिकारी, तलाठी, तहसीलदार हे लाभार्थ्यांपर्यंत जाऊन त्यांना लाभ देत आहेत. लाभार्थी स्टेजवर येऊन लाभ घेतात हे चित्र देशात फक्त आपल्या राज्यात दिसत आहे. आमच्या सरकारने एनडीआरएफच्या निकषापेक्षा जास्तीची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना दिली आहे. अवकाळी पावसाच्या पार्श्र्वभूमीवर नुकसान होत असलेल्या ठिकाणी तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आले आहेत. केंद्र शासनाने शेतकऱ्यांना सहा हजार रुपये प्रधानमंत्री किसान योजनेत लाभ दिला आहे. त्याबरोबरच देशात महाराष्ट्र शासनाने नमो शेतकरी महासन्मान योजना घोषित करून आणखी सहा हजार प्रति शेतकरी लाभ देण्यात सुरूवात केली आहे. अवकाळी गारपीटीग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यात शासन हात आखडता घेणार नाही, असेही श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मराठा आरक्षणविषयावर सरकारची भूमिका ही सुरुवातीपासून अतिशय प्रामाणिक आहे. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसींवर कुठलाही अन्याय होणार नाही तसेच इतर समाजावर अन्याय होणार नाही. तसेच कोणाचेही आरक्षण कमी केले जाणार नाही, ही आमची स्पष्ट भूमिका आहे. त्यावर मंत्रिमंडळ हे ठाम आहे. मराठा समाजाला । पान २ वर

## परदेशातून चालणाऱ्या १०० वेबसाईट्स सरकारकडून बंद

नवी दिल्ली : सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी सरकारकडून नवनवीन पद्धती अवलंबल्या जात आहेत. अलीकडे सरकारने बेकायदेशीर गुंतवणूक आणि अर्धवेळ नोकरीची फसवणूक करणाऱ्या वेबसाइट्सवर कारवाई केली आहे. वास्तविक या वेबसाईट्सकडून युजर्सची दिशाभूल आणि आर्थिक फसवणूकही करत होत्या. या वेबसाइट्स परदेशातून हाताळल्या जात होत्या आणि त्यांचे भारतात मोठे नेटवर्क होते, अशी माहितीदेखील समोर आली आहे.

गेल्या आठवड्यात इंडियन सायबर क्राईम कोऑर्डिनेशन सेंटर या गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत युनिटने वर्टिकल नॅशनल सायबर क्राइम थ्रेट ॲनालिटिक्स युनिटच्या मदतीने अशा वेबसाईट्सची पडताळणी केली होती. या कालावधीत, गुंतवणूक आणि टास्क-आधारित अर्धवेळ नोकरीच्या फसवणुकीत गुंतलेल्या १०० वेबसाइट्सची ओळख पटवण्यात आली आणि त्या ब्लॉक करण्यात आल्या. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० चा वापर करून या सर्व वेबसाइट्स ब्लॉक केल्या होत्या.या वेबसाइट्स, टास्क आधारित संस्था बेकायदेशीर गुंतवणुकीत गुंतलेल्या आढळल्या आणि आर्थिक गुन्ह्यांशी जोडल्या असल्याचे आढळून आले. त्यांचे संचलन परदेशातून सुरू असल्याचे तपासादरम्यान उघड झाले. डिजिटल जाहिराती, चॅट मेसेंजर आणि भाड्याने घेतलेल्या खात्यांचा वापर गुन्हे करण्यासाठी केला जात होता. कार्ड नेटवर्क, क्रिप्टोकरन्सी आणि परदेशातील एटीएममधूनही परवानगीशिवाय पैसे काढले जातात.

चशळींध ने २३२ ॲप्स ब्लॉक केले होते आणि ते परदेशातून ऑपरेट केले जात होते. त्यात बेटिंग, जुगार आणि बेकायदेशीर कर्ज सेवा देणार्या चिनी ॲप्सचाही समावेश । पान २ वर

## हिवाळी अधिवेशनासाठी नवाब मलिक उपस्थित राहणार



मुंबई : वैद्यकीय कारणास्तव अंतरीम जामिनावर तुरुंगातून बाहेर आलेले नवाब मलिक हिवाळी अधिवेशनासाठी हजेरी लावणार असल्याची माहिती समोर येत आहे. उद्यापासून सुरु होणाऱ्या हिवाळी अधिवेशनासाठी नवाब मलिक हे नागपूरच्या दिशेने रवाना झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सध्या नवाब मलिक हे वैद्यकीय जामीनावर बाहेर आहेत. त्यामुळे, आता उद्याच्या अधिवेशनात नवाब मलिक हे शरद पवार की अजित पवार गटाच्या बाजूला बसणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे मालिकांच्या वतीने सध्यातरी आपण तटस्थ असल्याची भूमिका जाहीर करण्यात आली आहे.

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला ७ डिसेंबर म्हणजेच उद्यापासून सुरुवात होत आहे. त्यासाठी आजपासून सर्वच पक्षातील नेते आणि आमदार नागपुरात दाखल होतांना पाहायला मिळत आहे. राज्यात गाजत असलेल्या वेगवेगळ्या मुद्यांवरून हे अधिवेशन गाजण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे याच अधिवेशनाच्या निमित्ताने पुन्हा एकदा राष्ट्रवादीचे आमदार नवाब मलिक देखील चर्चेत आले आहे. कारण वैद्यकीय कारणास्तव अंतरीम जामिनावर तुरुंगातून बाहेर आलेल्या मलिक यांनी राष्ट्रवादीत झालेल्या गटबाजीनंतर आपण कोणत्या गटात जाणार याबाबत कुठलेही भूमिका स्पष्ट केलेली नाही. तर,उद्यापासून सुरु होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात नवाब मलिक उपस्थित राहणार आहे. त्यामुळे मलिक हे शरद पवार की अजित पवार गटाच्या बाजूला बसणार याची चर्चा होत आहे.

## रिपाइं आठवले गटाच्या वतीने महामानवास अभिवादन

अक्कलकोट/प्रतिनिधी : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने महामानवाला पुष्प अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी अभिवादनपर मनोगत व्यक्त करताना बोललो की भारत महासत्ता होण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहे त्याचा मुळ पाया बाबासाहेबांनी रचला आहे असा महामानव पुन्हा होणे नाही असे विचार व्यक्त केले. तसेच रिपाइं शहर अध्यक्ष अजय मुकणार यांनी अभिवादनपर मनोगत व्यक्त करताना बोलले कृषी क्षेत्र, आर्थिक क्षेत्र, जल विषयक धोरण, देशाचे परराष्ट्र धोरण अशा प्रत्येक क्षेत्रात तज्ञ व्यक्तित्व म्हणून बाबासाहेबांनी देशाच्या विकासासाठी योगदान दिले आहे.अशा सर्व क्षेत्रात तज्ञ असलेले अष्टपैलू । पान २ वर



## ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे वैद्यकीय अधीक्षकपदी डॉ रवींद्र बनसोडे यांची नियुक्ती



अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे नूतन अधिक्षक म्हणून डॉक्टर श्री रवींद्र बनसोडे यांनी रुजू झाले आहेत मागील ४ वर्षाचा अनुभव असून स्वामी सेवा व अक्कलकोट वासियांचे रुग्णसेवा करण्यासाठी सदैव तत्पर असणार असल्याचे मत डॉक्टर रवींद्र बनसोडे यांनी व्यक्त केले

अक्कलकोट - गेल्या दोन वर्षापासून अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे, वैद्यकीय अधीक्षक पदाची नियुक्ती करण्यात आलेली नाही, अक्कलकोट तीर्थक्षेत्र असून महाराष्ट्र कर्नाटकाच्या सीमेवर वसलेला गाव कायमचा दुष्काळी परिस्थितीत असतो तालुक्यातील गोरगरीब जनता मोठमोठे दवाखाना खर्च त्यांना परवडत नाही त्यामुळे ग्रामीण रुग्णालया अक्कलकोट येथे उपचारासाठी येत असतात परंतु जबाबदार म्हणून वैद्यकीय अधीक्षक या ठिकाणी नाही याबाबतचा सिव्हील सर्जन यांना अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिनांक १७/ २ / २०२२ पत्र दिले होते तसेच उपसंचालक आरोग्य सेवा उपसंचालक आरोग्य मंडळ पुणे श्री संजोग कदम यांचाही पत्र ११/ १०/२०२२ आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडील पत्र १९/९/२०२२ व वंचित बहुजन आघाडी जिल्हा अध्यक्ष यांचा पत्र ८/ १२/२०२२ इतके पत्र सिव्हील सर्जन यांना देऊन सुद्धा ही वर्ष दीड वर्ष होत आले अजूनही वैद्यकीय अधीक्षक । पान २ वर

## ग्रामपंचायत व जिल्हा परिषद शाळा गोगांव वतीने महामानवास अभिवादन






अक्कलकोट/प्रतिनिधीः डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ग्रामपंचायत गोगांव येथे जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप,उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, कल्लप्पा बनसोडे, राजकुमार गायकवाड यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक अभिवादन करण्यात आले यावेळी पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, सुर्यकांत जिरगे, सुरेश सोनकांबळे, परमेश्र्वर गायकवाड, शांतकुमार बनसोडे, चीतानंद सोनकांबळे, नितीन गायकवाड, दत्ता फुलारी, दत्ता सोनकवडे, नामदेव बनसोडे, मलिनाथ जिरगे उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळा गोगांव येथे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, सरपंच संघटना तालुकाध्यक्ष प्रदीप जगताप, ग्रामसेवक विक्रम घाटे,पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले या वेळी शालेय मुला मुलींनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित भाषण केले यावेळी शंकर कारभारी , फुंडलिक वाघमारे, ज्योती आलुरे विजयकुमार गायकवाड, आकाश गायकवाड, उपस्थित होते

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
गुरुवार दि.०७ डिसेंबर २०२३


## संपादकीय

### काँग्रेसच्या ताब्यातून गेली..

मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांत ज्या दणदणीतपणे भाजपचा विजय झाला आहे, त्यावरून देशात केवळ ‘मोदी की गॅरंटी’च काम करते, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. तीनही राज्यांत भाजपने नियोजनबध्द योजना आखून या निवडणुकीत विजय प्राप्त केला आणि मोदी यांना २०२४ मध्ये टक्कर देण्याचे स्वप्न पाहणाऱ्या ‘इंडिया’ आघाडीचे स्वप्न भंगले. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी तेलंगणापासून सुरू केलेल्या ‘भारत जोडो’ यात्रेपासून स्वतःबद्दल माध्यमांच्या मदतीने विश्वास निर्माण केला होता, त्याचा चक्काचूर झाला आहे. भारतात केवळ एकच गॅरंटी काम करते आणि ती ‘मोदी की गॅरंटी’ आहे, यावर जनतेचा विश्वास बसला आहे. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी आणि इंडिया आघाडीचे सारेच नेते स्वतःला मोदी यांना पर्याय म्हणून समोर आणण्याच्या तयारीत होते. त्यांचा पार सफाया झाला आहे. तेलंगणाने थोडी फार साथ दिली नसती तर काँग्रेसला तोंड काढणे मुश्कील झाले असते. ‘मोदी की गॅरंटी’मुळे राहुल आणि कंपनीच्या अस्तित्वावरच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. काँग्रेसला राहुल आणि प्रियांका हे विजय मिळवून देऊ शकत नाहीत, हे अजून किती काळ समजणार नाही, हा एक प्रश्न आहे. या निकालामुळे लोकसभा निवडणुकीतही मोदी यांच्या विजयाची हॅट्ट्रिक साध्य केली जाणार ही बाब अधोरेखित झाल्यासारखीच आहे. काँग्रेसला आता लोकसभेच्या जागा वाटपात पूर्वीचे स्थान तर राहिले नाही. उलट इंडिया आघाडीतील इतर घटक पक्ष काँग्रेसच्या वाट्याला जितक्या जागा देतील तितक्यावर समाधान मानण्याशिवाय काँग्रेसला गत्यंतर नाही, अशी वाईट परिस्थिती काँग्रेसला आली आहे. काँग्रेसची बार्गेनिंग पॉवर प्रचंड घटली आहे. संपूर्ण निवडणूक प्रचारात मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार प्रहार केले. पण त्यापेक्षाही मोदी यांच्या ताब्यात देश सुरक्षित आहे, यावर जनतेचा जास्त विश्वास होता आणि तो आणखी दृढ झाल्याचे दिसले. कोणत्याही गोष्टीची गॅरंटी नसते पण ‘मोदी की गॅरंटी’ हीच तेवढी खरी असते, यावर जनतेनेच शिक्कामोर्तब केले. भाजपने मोदी की गॅरंटीवर प्रचाराचा भर ठेवला होता आणि त्याचे परिणाम आज तीन राज्ये काँग्रेसच्या ताब्यातून गेली आहेत.

## समाज आणि परिवर्तन

समाज म्हणजे जात समूह मुळीच माणू नये.समाज ही संकल्पना समजून घेताना गौतम बुध्दांचा ’बहुजन हिताय बहुजन सुखाय’ हा विचार समजून घेणे महत्वाचे आहे.अनेक क्रांत्या भारतामध्ये झाल्या.प्रत्येक क्रांतीने बदलाचे पुढचे पाऊल टाकले आहे.आजच्या तंत्रज्ञान युगातली मुळक्रांती वर्तमान समाजास ज्ञात आहे का? ह्या प्रश्र्नाचे उत्तर अनुत्तरित असेल.कारण शिक्षण,नोकरी ह्या क्षेत्रात कित्पत विद्यार्थी,बेरोजगार सामावून घेतला जातोय हा विचार पक्षपाती धोरण करू शकणार नाही.म्हणून आम्हाला आजही इतिहासाचा संदर्भ घेतल्याशिवाय पर्याय राहत नाही. समाज जातविरहीत संकल्पनेतून बाहेर पडून ’मानवी समाज’ ही व्यापक दृष्टी नजरे समोर असावी लागते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर; विचार परिवर्तन सर्व समस्याचे कारण सांगतात. त्याला भावनिकतेने समजून घेता येणे शक्य नाही.तर्काधारित सत्य विचार-आचाराने माणूस जोडता येतो.धर्म,विषमता,अज्ञान,अंधविश्र्वास ही हजारो वर्षापासून मानवी समाजात दुरावा निर्माण केलेली मानवी समाजांतर्गत प्रमुख घटक आहेत. वर्तमानात नव्याने ही रूढी आपले प्रस्थ प्रस्थापित करत आहे.ह्याचे कारण आत्मसन्मान गमावलेली मानसिकता आहे.माणूस माणसाची थोरवी गातो,रक्तही सांडतो,आपला म्हणून किंवा दुसरा समजून ही गती की अधोगती हा चिंतनाचा विषय आहे.

आज महापुरूष केवळ भाषणातली ठळक वैशिष्ट्ये म्हणून शिल्लक राहिली आहेत.कोणत्याच महापुरूषांनी माणूस नाकारला नाही.किडूक-मिडूक बुध्दीकौशल्याने जात-धर्माचा जाहिरनामा प्रत्येक चौका-चौकात मांडला जातोय आणि त्याला दुजोरा दिला जातो,गुमान जगणा-या मानसिकतेकडून स-हासपणे. हजारो वर्षातल्या कोणत्या काळातला दाखला घेऊन ही परिस्थिती उद्भवली असेल याचा विचार कोण करणार?कोण जबाबदार बदलत्या स्पर्धेतून रिझेक्ट करणा-या व्यवस्थेची शहानिषा झाली नसेल; तर पुन्हा पुन्हा केली पाहिजे ह्या रंगासाठी रंग बदलणा-या खोट्या चेह-यांची आणि त्यांच्या हमरस्त्याची बिनदिक्कत राजरोसपणे करावी. ’कायद्याच्या राज्यात पक्षपातिपणा जोरात’ कसा टिकवला जातोय हा विचार नको काय मानवी समाजात व्हायला. इतिहासातल्या हिनत्वाची पुनरावृत्ती होते का हा विचार गंभीर होऊन खंबीरपणे करायला हवा. इथल्या व्यवस्थेत कस्तुरी कुठल्या घटकाला समजताय,कोण मानवतावादी सुगंध पसरावेल.ह्याची निश्र्चिती नसून विषमतावादी दुर्गंधी ह्यात दिसून येते.जाती-जातीने पेटलेला वणवा ’माणूस’ संपवणारा आहे,राज्य नव्हे. राज्यकर्ते शाबूत राहतील.पुन्हा-पुन्हा पेट घेतलेला वणवा शमवण्याचा नाटकी खेळ करतील; परंतू पेट घेण्याआधी हा वणवा कधीच विझवला जाणार नाही.ही पिढीजात शोकांतिका नव्हे काय?जातधर्माच्या पलिकडे मानवी दुर्बिनीतून हे बघता येत.

शिक्षण,उद्योग,नोकरी ह्या कार्यक्षेत्रात बदल हवा असेल तर आपले आपण हा सिध्दांत नव्याने स्विकारावा लागेल.किती दिवस ह्या प्रस्थापित व्यवस्थेला जाब विचारणार.शिक्षण संस्था आणि उद्योग निर्मिती हेच समाज आणि नवपरिवर्तनाचे मुळ आहे. शिक्षणाचे खाजगीकरण करणे म्हणजे इथला बहुसंख्य मानवी समाज हा परिवर्तनापासून दूर ठेवणे होय.हल्ली शिक्षण नसणे हे गुलामीचे मुळ लक्षण मानले जाते.नालंदा,तक्षशिला,विक्रमशिला ही विश्र्वविद्यालये पैसा कमावण्यासाठी नव्हते तर मानवी मुल्य रूजवणे आणि माणूस घडवण्याची रित होती.आपले आपण करावे उध्दार,नको तो लाचार निष्क्रियपणाचा आधार.

दिवसाढवळ्या स्त्रीयांवर बलात्कार होतो,त्यांची नग्नधींड ह्याच स्त्रीप्रधान भारतमातेच्या राष्ट्रात निघते.आजही मंदिरातल्या प्रवेशाने जीव घेतला जातो.एकीकडे बलाढ्य लोकशाही राष्ट्राचा उदोउदो करून महासत्ताक बनण्याचा संकल्प केला जातो.इथल्या व्यवस्थेला जागतिक स्थरावर मानवतेला नकार दिला म्हणून तर डिलीट केल जात नसेल.हा प्रश्र्न नक्की उद्भवतो.ज्या मस्जिदीला उधवस्त करून भव्यमंदिराची निर्मीती होते आहे,त्यामध्ये ज्या महाराष्ट्रातील ओबीसी आणि मराठा समाज लढा दिला त्याच बहुजन बांधवामध्ये आरक्षणावरून दुही निर्माण झाली.इथे वास्तूला महत्व आहे परंतू त्या वास्तूला जे हात लागतात ते हात कलम केले जातात.किंवा त्यांना नाकारले जाते.ही वास्तवता नाकारता येत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणातून मानवी समाज आपली क्रांती करेल ही अपेक्षा होती.आरक्षण हे मानवी समाज बदलण्याचे शास्त्र नसून ते शैक्षणिक,राजकीय दृष्टीने समानता आणण्याचा मार्ग होता.परंतू इथल्या प्रस्थापित राजकारण्यांनी त्याचेही राजकारण केले.एखाद्या समाजाची प्रगती ही त्याने निवडलेल्या मार्गावर अवलंबून असते,सरकारी योजनांवर नाही.याची जाणीव असावी.म्हणून बाबासाहेब म्हणतात इतिहास विसणारी माणसे कधीच इतिहास घडवू शकत नाहीत.दारिद्र्याने खचलेला मानवी समाज आजही देशात बहुसंख्य आहे.तो तसाच राहावा आणि आमची राजकीय पोळी भाजली जावी ही भूमिका प्रस्थापित राजकारण्यांची राहिली आहे.’समाज आणि परिवर्तन’ ह्या लेखामधील मांडणी सर्वमान्य असेल याची शक्यता कमी आहे.परंतू विश्र्वास नाही ठेवला तरी चालेल पण विचार करावा ही विनंती राहील.

आजच्या काळाला बदलता काळ समजला जातो.परंतू जातीजातीने,गटागटाने परिवर्तनाच्या प्रवाहाने चालतो असा भास प्रकर्षाने दिसून येतो.ह्या देशात अलिखीत पण प्रकर्षाने प्रतिक्रांती केल्याचे वैदिक दिसून येतात.त्याला पाहण्याची दृष्टी आणि वाचण्याची महत्वकांक्षा असावी लागते.त्या विचाराने प्रेरित झालेल्या गोडबोल्या नेतृत्वास कित्पत समाजमनात स्थान द्यावे हे विचारांती समाज निर्णय होऊ शकतो.परिवर्तन हे माणूस नाकारून कदापि शक्य नाही.जात आणि धर्म तर ’मानवी समाज’ ही संकल्पना कधीच स्विकारू देत नाही.भारतीय संविधानाच्या प्रास्तावनेत ’आम्ही’ ला महत्व देण्यात आले.ही भूमिका आम्ही स्विकारली पाहिजे.

महापुरूषांच्या विचाराचा दाखला देऊन आजही विचार मांडले जातात.याचा अर्थ त्यांना अपेक्षित समग्र क्रांती अजूनही झाली नाही.जेंव्हा महापुरूषांच्या विचाराचा संदर्भ देण्याचे थांबेल तेंव्हा त्या महापुरूषांच्या विचाराचे राज्य आले असे म्हणता येईल.नाहीतर नाही.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हा विचारमार्ग असून तो स्विकारावा लागतो.तो मार्ग लादता येत नाही.कारण मानवता लादून चिरंतन राहत नाही तर ती माणूस म्हणून स्विकारावी लागते.हे धारिष्ट्य इतके सहज आणि सोपे मुळीच नाही.

समाज हिच नांदी आहे. परिवर्तनाचा धागा आहे मानवी जीवनाचा अर्थ समजावून सांगणा-या समतानायकास महापरिनिर्वाण दिनी विनम्र अभिवादन...

**-बाबासाहेब सोनकांबळे (जे.एन.सामाजिक संघटना)**

पान १ वरुन

### हिवाळी अधिवेशनात विदर्भ,..

टिकणारे, कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. त्यामुळे दोन्ही समाजाने संयम ठेवावा.

आज महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन आहे. यानिमित्ताने आज सकाळीच सर्वजण चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन करून आलो आहोत, असे सांगून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नुकतेच चार राज्यांमध्ये चक्रीवादळ आले होते. त्यामुळे हवामान विभागाने पुढचे तीन दिवस आपल्याकडे विशेषतः विदर्भामध्ये पावसाची शक्यता वर्तविली आहे. जवळपास पाच जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट देखील देण्यात आला आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच ज्या ज्या ठिकाणी अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे किंवा होत आहे, त्या ठिकाणी कुठली वाट न पाहता पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यासंदर्भात प्रशासनाला निर्देश दिले आहेत. राज्यावर कर्ज वाढत असल्याच्या चर्चा आहे. मात्र, २०१३ साली आपली अर्थव्यवस्था १६ लाख कोटी होती, आज ही अर्थ व्यवस्था ३५ लाख कोटी इतकी झाली आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये अडीच पटीपेक्षा जास्त आपली अर्थव्यवस्था झालेली आहे. आज देशाच्या सगळ्या राज्यांच्या अर्थव्यवस्थेच्या तुलनेत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था समतोल आहे. एनसीआरबीच्या अहवालात राज्य गुन्हेगारी दुसऱ्या क्रमांकावर असल्याचे म्हटले आहे. मात्र, या अहवालात लोकसंख्या व एकूण गुन्हेगारीची वर्गीकरण यावर त्याचे विश्र्लेषण करणे आवश्यक आहे. हिवाळी अधिवेशनात सत्तारूढ पक्ष सर्व प्रकारच्या चर्चेसाठी तयार आहे. सभागृहामध्ये शेतकरी, आरक्षणाचे प्रश्र्नांवर सकारात्मकतेने चर्चा करण्यात येतील व त्यावर समर्पक उत्तरे देण्यात येईल. महाराष्ट्राच्या हितासाठी सकारात्मक अशा प्रकारचे निर्णय या अधिवेशनामध्ये होतील, असा विश्र्वासही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार म्हणाले की, विदर्भात होत असलेल्या या हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने या सरकारच्या वतीने विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातल्या इतर प्रश्र्नांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे. विदर्भातील आणि राज्यातील जे प्रश्र्न सत्तारूढ पक्षातर्फे आणि विरोधी पक्षाच्या तर्फे मांडले जातील त्या सर्व प्रश्र्नांवर सभागृहामध्ये अतिशय सकारात्मक चर्चा करून ते सर्व प्रश्र्न सोडवण्याचा राज्य सरकारचा निश्र्चय आहे. या अधिवेशनात पुरवणी मागण्या मांडण्यात येणार असून याद्वारे सर्वांचे समाधान होईल, याचा प्रयत्न राहणार आहे. विदर्भात शेती प्रश्र्नावर प्रामुख्याने कापूस, सोयाबीन, तूर, धान, संत्रा आणि इतर पिकांबाबत तसेच अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानी संदर्भात चर्चा होईल व न्याय देण्याचं काम या सरकारच्या माध्यमातून होईल.

केंद्राच्या आर्थिक शिस्तीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केल्यामुळे राज्याची केंद्राकडे आर्थिक पत चांगली आहे. त्यामुळे केंद्र शासनाने ठरविलेल्या निकषानुसार आपण यावर्षी एक लाख वीस हजार कोटीचं कर्ज काढू शकतो. मात्र, आम्ही मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली अंदाजे ८० हजार कोटींचे कर्ज काढण्याचे ठरविले आहे. राज्याचा जीएसडीपी २०१३-१४ ला १६ लाख कोटी होता, तो यावेळी मार्च २०२४ पर्यंत सुमारे ३८ लाख कोटींपर्यंत वाढणार आहे, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

चहापान कार्यक्रमाला मंत्रिमंडळ सदस्यांसह विधीमंडळ सदस्यांची उपस्थिती नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या रामगिरी या शासकीय निवासस्थानी आज चहापान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्यासह मंत्रीमंडळातील सदस्य, विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे सदस्य उपस्थित होते.

### परदेशातून चालणाऱ्या १०० ..

होता. Lazypay.in ला देखील ब्लॉक करण्यास सांगितले होते. ही डच गुंतवणूक फर्म झ्रीााि ची उपकंपनी होती. मे महिन्यात चेस इंडियाच्या अहवालात स्वयं-नियामक संस्था स्थापन करण्याची मागणी करण्यात आली होती. एका व्यक्तीला टेलिग्राम वर पार्ट टाईम जॉबसाठी मेसेज आला आणि त्याच्या खात्यातून लाखो रुपये लंपास झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बंगळुरुमध्ये ही घटना घडली असून या व्यक्तीच्या खात्यातून तब्बल ६१ लाख रुपये गायब झाल्याची घटना घडली आहे.उदय उल्हासला टेलिग्रामवर पार्ट टाईम नोकरीची ऑफर मिळाली. ऑफर पाठवणारी सायबर गुन्हेगार एक महिला होती. या महिलेने तिचं नाव सुहासिनी असल्याचं सांगितलं. मीडिया रिपोर्ट्सनुसार, या पार्ट टाईम जॉबमध्ये व्यक्तीला वेबसाइटच्या लिंकवर क्लिक करुन काम करण्यास सांगितलं होतं.

या महिलेने आधी उदयचा विश्र्वास जिंकला आणि त्याला गुंतवणूक करण्यास सांगितलं. मोठी गुंतवणूक केल्यास भरघोस परतावा मिळण्याचं आमिष दाखवलं आणि योजनेबद्दल सांगितलं. या महिलेने उदयला सुरुवातीला १० हजार रुपयांची गुंतवणूक करून २० लाखांपर्यंत कमाई करण्याचं आमिष दाखवलं.

### रिपाइं आठवले गटाच्या वतीने

व्यक्तिमत्त्व म्हणजे बाबासाहेब असे विचार त्यांनी व्यक्त केले.यावेळी अक्कलकोट चे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, रिपाइं तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, भाजपा अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष नन्नू कोरबू, रिपाइं शहर अध्यक्ष अजय मुकणार, प्रहार चे अमर शिरसाट, दिनेश रुही, शुभम मडिखांबे, पंकज मडिखांबे, राजकुमार झिंगाडे, मल्लिनाथ अळगी, धनंजय घडले, महमद धडधडे,सैफन शेख, राजू भगळे, अंबादास गायकवाड, रशिद ख्रिस्तके, सुखदेव सुतार, सुरेश गायकवाड,आकाश माने,शकिल नायकवडी, नितेश मडिखांबे, दस्तगीर मुजावर, यांच्या सहित इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट..

पदाची नियुक्ती झालेली नव्हती त्यामुळे अक्कलकोट स्वामी भक्तांना होणारा त्रास किंवा एखादा आजार निवारण करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे डॉक्टर उपलब्ध नसतात या सगळ्या गोष्टीचा विचार करून लवकरात लवकर वैद्यकीय अधीक्षक पदाची नियुक्ती करावी अन्यथा वंचित बहुजन आघाडी शहर व तालुक्याच्या वतीने जिल्हा शल्य चिकीस्तक कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू करु असा इशारा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने तालुकाध्यक्ष चंद्रशेखर मंडीखांबे यांनी दिले होते अक्कलकोट तालुक्यातील रुग्णांना नवीन अधिक्षक मिळाल्यामुळे उपचारासोबत विविध दाखल्याचे समस्या ग्रामीण भागातील लोकांचे मार्गी लागणार आहेत

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करण्यासाठी ३१ जुलै १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नानकचंद रत्तू यांचेकडे खंत व्यक्त करताना संदेश दिला होता की, मी हा आंदोलनाचा कारवाँ, चळवळीचा रथ अनंत अडचणींतून इथपर्यंत आणलेला आहे, तो आपणास पुढे नेता आला नाही तर किमान मागे तरी जाऊ देऊ नका. या विधानाची प्रासंगिकता लक्षात घेऊन विधानाच्या ६७ व्या वर्धापनदिन व महापरिनिर्वाण दिनानिमित्त या ज्वलंत विषयावर बामसेफ अंतर्गत फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने डॉ आर. एस. धनेगांवकर, मैत्रेय, ज्ञानतीर्थ हाऊसिंग सोसायटी, शासकीय वस्तीगृहाजवळ एन-८, सिडको, छत्रपती संभाजी नगर,(औरंगाबाद) महाराष्ट्र येथे ३ डिसेंबर २०२३ ला एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जेणेकरून फुले शाहू आंबेडकराईट चळवळीचे संघटनात्मक कार्यात वृद्धी होऊ शकेल.

या कार्यशाळेचे उदघाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी बँकेच्या संचालिका छायाताई मेश्राम यांनी केले. त्या म्हणाल्या की, वाईट प्रवृत्तीच्या लोकांकडून भारताचे संविधान यावर अंमलबजावणी करणे कठीण होत आहे. जाती आधारित क्रमिक असमानता सर्व समस्यांचे मूळ आहे. वर्तमान राज्यकर्त्यांनी ११३ सार्वजनिक उद्योगधंद्याचे खाजगीकरण केल्याने समाज गुलामीकडे वाटचाल करीत आहे. करिता यामागील मनुवाद्यांचे षडयंत्र समजून घेतले पाहिजे. परिणामी सुशिक्षित वर्गाची जबाबदारी वाढत चालली आहे. यांप्रसंगी लक्ष्मीकांत पट्टेबहादूर म्हणाले की, सर्वांना समजून घेणे आवश्यक आहे. एड. शंकरराव नारनवरे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयासमोर बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसविने हे बाबासाहेबांच्या विद्वत्तेचे प्रतीक आहे. न्याय व्यवस्था ही स्वतंत्र आहे. ओबीसींना भारताचे संविधानातील तरतुदींची आवश्यकता समजावून सांगण्याची जबाबदारी आपण पार पाडली पाहिजे. गो. गो. बोधी म्हणाले की, आव्हाने स्विकारून तोडगा काढला तर चळवळीचा रथ पुढे जाईल. सांडू साळवे म्हणाले की, संघटना मजबूत करायला पाहिजे. प्रभाकर उंदरे म्हणाले की, ब्राह्मण माटे मास्तर अस्पृश्यांना शिकवत असायचे म्हणून घरी गेल्यावर त्यांची पत्नी गोमूत्र शिंपडून सुद्धीकरण करायची. या बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या उदाहरणाची जाणीव करून दिली. भीमराव धाकडे म्हणाले की, वर्तमान शासकांनी अनेक कायद्यात बदल केलेला आहे. परिणामी भारताचे संविधान फारच संकटातून जात आहे. भानुदास बागूल म्हणाले की, चांगल्या वाईटातून पुढे जात असताना तरूण पिढीला मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. एम. व्ही. गंगावणे म्हणाले की, मनात चांगले विचार असतील तर चांगल्या कृती घडू शकतील. एक समस्या ही चांगले काही करण्यासाठी एक संधीच असते. आर. ए. खिल्लारे म्हणाले की, वाईट सोडून चांगले पुढे घेऊन जावे. मैत्री, शील, समाधी, प्रज्ञा च्या सम्यक मार्गाने पुढे जाऊया. सुधाकर मेश्राम म्हणाले की, आपण या चळवळीचे लाभार्थी असल्याने वज्जीगणाच्या नियमानुसार शेवटच्या क्षणापर्यंत चळवळीचे कार्य केले पाहिजे. प्रा. ग. ह. राठोड म्हणाले की, शहरापासून दूर खेड्यापाड्यात कुणाला संविधानातील हक्क, अधिकार आणि कर्तव्य याची जाणीवच नाही. शत्रू चे षडयंत्र समजून घेतली पाहिजेत. डॉ. रमेशचंद्र धनेगांवकर म्हणाले की, भारताचे संविधानाच्या माध्यमातून समता प्रस्थापित केली पाहिजे. आपल्या महापुरुषांनी विद्या नावाची संजिवनी प्राप्त करून दिली. स्वातंत्र्य अबाधित राहावे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. इंजिनिअर बी. पी. रणयेवले म्हणाले की, कार्यकर्त्यांना समाजातून बहिष्कृत करणे ही बाब वाईट असली तरी यातून विद्रोहाची भावना निर्माण होते. अशोक साळवे म्हणाले की, महापुरुषांच्या विचारांचे आपण अनुसरण केले पाहिजे. प्रमुख वक्ते धनराज गोंडाणे म्हणाले की, बुद्धाचा धम्म सुखदायक आहे. अनेक संघटना उदयास आल्या मात्र त्यांच्या समोर ध्येय नसल्याने त्या लयास गेल्या. फुले शाहू आंबेडकरांचे विचार पुढे घेऊन जाण्यास समोर येणे हे महत्वपूर्ण आहे. माणूस धर्मासाठी नव्हे! तर धर्म माणसासाठी आहे. भारताचे संविधान धोक्यात आले आहे. म्हणून त्या संविधानाचे समर्थन, सम्मान,सुरक्षा आणि संवर्धन झाले पाहिजे..

या कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्प्रयासाने हा आंदोलनाचा कारवाँ, चळवळीचा रथ इथपर्यंत आणला. कितीही कठीण परिस्थिती आली तरी तो कारवाँ पुढेच जात राहावा. जर अनुयायी पुढे घेऊन जाण्यास असमर्थ ठरले तर त्यांनी तो तिथेच ठेवावे मात्र कुठल्याही परिस्थितीत मागे जाऊ देऊ नये. हा जो संदेश डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी नानकचंद रत्तू कडे दिला होता. यावर आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे. त्यांनी प्रोफेसर आर्नोल्ड टोयंबी यांचे विधान स्पष्ट केले होते, ज्यात म्हटले आहे की, या देशात सुक्ष्म दर्शकातून पाहिल्यावर सुद्धा ज्यांचे अस्तित्व जाणवण्याची शक्यता नाही अशा अल्पसंख्याक लोकांकडे या देशातील सत्ता, संपत्ती आणि संधीची एकाधिकारशाही निर्माण झाली आहे. करिता समाजात राजनीतिक क्रांतीच्या पूर्वी सामाजिक क्रांती होणे आवश्यक आहे. याची जाणीव ठेवून आपण मार्गक्रमण केले पाहिजे. जेणेकरून वैज्ञानिक, आधुनिक भारताची आपणाला निर्मिती करता येईल. डॉ बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात की, तिथे विनाशाची स्थिती निर्माण होईल आणि अशी समस्या प्रत्येक समाजात, प्रत्येक संघटनेत, प्रत्येक संस्थेत पहायला मिळेल. अशा वेळी जुने मार्ग, जुने विचार, जुन्या सवयी समाजाला वर घेऊन जाण्यास असमर्थ ठरत असल्यास नवीन मार्ग शोधायला हवे अन्यथा या समाजात आपल्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल. अशीच परिस्थिती सध्या आपल्यासमोर ऊभी टाकल्याचे जाणवते. यावर उपाय योजना म्हणून बाबासाहेब म्हणतात की आपण नवीन मार्ग शोधले पाहिजेत. अन्यथा समाज खालच्या स्तरात जाईल. करिता डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी ९ मार्च १९२४ ला शिका, संघर्ष करा आणि संघटीत व्हा असा संदेश दिला होता. जे पुढे २० जुलै १९२४ ला स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य ठरले. या त्रिसूत्री चा अन्वयार्थ नीट समजून घेतला पाहिजे. यात संघटीत होण्यासाठी संघर्ष करा असे सांगितले आहे. मात्र आपण संघटीत न होता हक्क अधिकारांसाठी संघर्ष करीत आहोत. पुढे जाऊन २० जुलै १९४२ ला नागपूर परिषदेत शिक्षित व्हा, चळवळ (संघर्ष) करा, संघटीत व्हा, आत्मविश्र्वास बाळगा आणि कधीही धीर सोडू नका ही आमच्या जीवनाची पंचसूत्री आहे, असा संदेश दिला. तसेच २२ डिसेंबर १९५२ ला पुण्यातील जिल्हा न्यायालयातील ला लायब्ररीत आपल्या भाषणात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक कामकाजाच्या पूर्ववर्ती शर्थी आपण समजून घेऊन आपआपल्या पक्ष, संघटना, संस्था आणि समाजात त्याची अंमलबजावणी केली तर आपली वाताहात होणार नाही. परिणामी हा चळवळीचा कारवाँ आपण पुढे घेऊन जाऊ शकतो. करिता आपण जबाबदारीने कर्तव्य पार पाडली पाहिजेत.

या कार्यशाळेला प्रा. ग. ह. राठोड, लक्ष्मीकांत पट्टेबहादूर, एड. शंकरराव नारनवरे, एम. पी. गाढे, गो. गो. बोधी, सांडू साळवे, प्रभाकर उंदरे, भीमराव धाकडे, व्ही. आर. पवार, भानुदास बागूल, एम. व्ही. गंगावणे, छायाताई मेश्राम, सुधाकर मेश्राम, व्ही. एम. परघणे, अंकुश दाभाडे, आर. ए. खिल्लारे, डॉ. आर. एस. धनेगांवकर, इंजिनिअर बी. पी. रणयेवले, अशोक साळवे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वांनी विषयाच्या अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त केले आहे. शेवटी सुधाकर मेश्राम यांनी आभार व्यक्त केले अशाप्रकारे हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# ६७ व्या महापरिनिर्वाण दिननिमित्त दुधनी येथे विविध ठिकाणी महामानवास अभिवादन



दुधनी/ निंगप्पा निंबाळः विश्ववरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दुधनी येथे विविध ठिकाणी महामानवाला पुष्प अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

**दुधनी भीमनगर** संविधान शिल्पी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचा पूजन मान्यवरांच्या हस्ते करून त्रिशरण व पंचशील वंदना घेऊन महामानवाला अभिवादन करण्यात आले.यावेळी जेष्ठ नागरिक दरेप्पा शिंगे,लक्ष्मण लोड्डेन,सैदप्पा झळकी,सातलिंग निंबाळ,बसवराज जन्ना,सुरेश झळकी,सैदप्पा शंकर झळकी,पिंटु लोड्डेनवरू,शिवपुत्र गायकवाड,सुरेश गायकवाड, संतोष जन्ना,गुरूशांत गायकवाड,गुरू धोडमनी,निंगप्पा निंबाळ,श्रीमंत अल्लापुर,भीम झळकी,काशीनाथ रेऊर भीम झळकी,बसु मगी,गुरूशांत बसवनकेरी,शांतु जन्ना,सचिन धोडमनी,गौतम निंबाळ,मौला झळकी,अमर धोडमनी आदि भीमनगर मधील ग्रामस्थां सहित इतर मान्यवर उपस्थित होते.**बुद्ध नगर** येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचा पूजन मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आला. यावेळी गुरूशांत मगी,राघवेद्र बसवनकेरी, काशीनाथ लोड्डेनवरू, अंबण्णा बनसोडे,विद्यार्थी मगी, गणेश गायकवाड,लखन बसवनकेरी,शंकर बनसोडे,गौतम बसवनकेरी,

**दुधनी केंद्र शाळेत** जि.प.प्रा. केंद्र शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर ६७महापरिनिर्वाण दिन निमित्त महा वाचन उस्ताव कार्यक्रम घेऊन महामानवाला अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांनी व शिक्षकवृंध आणि मध्यावर मनोगत व्यक्त केले. प्रारंभी बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचा पूजन बाबा सर याचं हस्ते करण्यात आले यावेळी मराठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी शिक्षण तज्ञ सैदप्पा झळाळी व्यवस्थापन समिती सदस्य मैंदीमय जिडगे अंदेवाडी निंगप्पा निंबाळ गुरू धोडमनी उपस्थित होते शि.म.बाबा सर, संतोष जोगदे सर , परमेश्र्वर वागोले सर, गुरय्या सलगार सर , सिध्दु राठोड सर , विवेकानंद उद्दा सर , म.ई.कर सर ,मंत्री सर ,रवी कोरचगाव सर,संजीवकुमर बेण्णीसर सर , अतनुरे सर, चिंचुरे मॅडम चनशेट्टी मॅडम , डोंगराजे मॅडम, अरसगोंड मॅडम,कारेकर मॅडम.व कर्मचारी उपस्थित होते .

**भीमनगर कन्नड शाळा** भीमनगर जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळा येथे डॉ. बाबासाहेब अंबेडकर महापरिनिर्वाण दिन निमित्त महामानवाला अभिवादन केले प्रारंभी बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचा पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला नंतर विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांनी व मान्यवरांच्या आपल्या मनोगत व्यक्त केले यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेश झळकी उपाध्यक्ष बसवराज जन्ना शिक्षण तज्ञ शिवपुत्र गायकवाड सदस्य सुरेश गायकवाड सैदप्पा झळकी सातलिंग निंबाळ लक्ष्मण लोड्डेनवरू सैदप्पा झळकी गुरूशांत गायकवाड निंगप्पा निंबाळ गुरू धोडमनी आदि ग्रामस्थांना उपस्थित होते सूत्रसंचालन मल्लप्पा कांबळे यांना केली आभार शरणप्पा म्हेत्रे सर यानी मानले या कार्यक्रमात विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.

**दुधनी नगरपरिषद** दुधनी नगरपरिषद येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर ६७व्या महापरिनिर्वाण त्रिशरण व पंचशील वंदना घेऊन महामानवाला अभिवादन करण्यात आले. प्रतिमेचा पूजन नगरपरिषद चे मुख्याधिकारी अतिश वाळुंजे यांचा हस्ते करण्यात आले यावेळी मराठी नगरपरिषद कार्यलय अधीक्षक कोळी साहेब मल्लीनाथ म्हेत्रे गुरूशांत मगी शांतु माड्याळ सुदिर सरूगौड मौलप्पा गायकवाड व कर्मचारी उपस्थित होते यावेळी भीमनगर मधील भीम सैनिक उपस्थित होते.

**रेल्वे स्टेशन दुधनी** डॉ.बाबासाहेब आंबेडकर ६७व्या महापरिनिर्वाण त्रिशरण व पंचशील वंदना घेऊन महामानवाला अभिवादन करण्यात आले. प्रतिमेचा पूजन रेल्वे स्टेशन कर्मचारी वेलू केशवन यांचा हस्ते करण्यात आले यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या आठवले गट चे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळाळी रिपाई दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी परमशेट्टी हायस्कूल चे निवृत्त कर्मचारी नामदेव बनसोडे गौतम सक्करगी सैदप्पा आदिमनी मच्छिंद्र शिंगे अनिल गायकवाड चंद्रकांत रेऊर गोपाल पटेद सतिश कोळेकर कुपेंद्र आदिमनी मल्लू शिंगे अमार धोडमनी बसवराज (पिंटु) शिंगे गुरू धोडमनी निंगप्पा निंबाळ व आदि ग्रामस्थांना उपस्थित होते.

**म्हेत्रे प्रशाला** दुधनी येथे मातोश्री लक्ष्मी बाई सातलिंगप्पा म्हेत्रे प्रशाले व श्री गुरूशांतलिंगेश्र्वर जुनिय कॉलेज मध्ये ६७व्या महापरिनिर्वाण दिन निमित्त महामानवाला अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रशालेच मुख्याध्यापक व सर्व शिक्षक व जुनिय कॉलेजच्या शिक्षक वृंद कर्मचारी उपस्थित होते.

**परमशेट्टी हायस्कूल** दुधनी येथे एस. जी.परमशेट्टी हायस्कूल येथे महामानवाला वंदना करून अभिवादन करण्यात आला यावेळी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आले. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेचा पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मराठी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अप्पु परमशेट्टी सचिव स्वामीनाथ स्वामी साहेब व बाजार समितीच्या सर्व कर्मचारी उपस्थित.



## अंदेवाडी (ज) ग्रामपंचायतच्या वतीने महामानवास अभिवादन

दुधनी/ निंगप्पा निंबाळः डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अंदेवाडी येथे ग्रामपंचायत संरपच श्रीमती जगदेवी धोडमनी यांच्या

हस्ते प्रतिमेचे पूजन करून त्रिशरण व पंचशील वंदना घेऊन महामानवाला अभिवादन करण्यात आले सदर अभिवादनास सरपंच श्रीमती जगदेवी धोडमनी ,ग्रामसेवक नागनाथ सोरेगंव,रिपाई शाखा अध्यक्ष रमेश धोडमनी ,ऑपरेटर नागप्पा कलमनी ,सदस्य ओद्धसिद्द आमसिद्द पुजारी,सिद्दप्पा बिराजदार,कलप्पा बिराजदार, शांतगौड पाटील,देवेंद्र पाटील,भीमश धोडमनी,ईस्माईल नाकेदर, कविता धोडमनी व ग्रामपंचायत सर्व सदस्य, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशावर्कर, ग्रामपंचायत कर्मचारी, तंटामुक्त अध्यक्ष, पोलिस पाटील व ग्रामपंचायतील सर्व नागरिका उपस्थित होते .

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाणदिन साजरा



वागदरी/प्रतिनिधीः एस एस शेळके प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय वागदरी येथे ज्ञानाचे अथांग महासागर, महामानव परम पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ ७ व्या.महापरिनिर्वाण दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. त्यावेळी आपले विचार मांडताना प्राचार्य . अनिल देशमुख सरांनी विद्यार्थ्यांना म्हणाले की वाचनालयात अभ्यास करताना बाबासाहेबानी रात्रंदिवस अभ्यास करून भारतातल्या महाभयंकर रोग म्हणजेच अशिक्षित, अंधश्रद्धा, शोषित, पीडित, दलीत झोपलेल्या व बुरसटलेल्या समाजांचे रोग नायनाट करण्यासाठी शिक्षणाच्या शोध घेऊन डॉक्टर बनले व शिक्षणाच्या एक प्रभावी लसीने सर्व रोग नायनाट केले . तसेच विज्ञानाच्या जोरावर आपल्या शाळेतील विद्यार्थी बेंगळूरु येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय विज्ञान स्पर्धेत विद्यार्थ्याने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावून दिल्ली येथे होणाऱ्या अंतरराष्ट्रीय स्पर्धेत निवड झाल्या ने आपल्या शाळेचा मानाचा तुरा रोवल्याने व विज्ञानाची कास धरल्याने मला सार्थ अभिमान वाटत आहे असे उद्गार काढले .त्या नंतर पर्यवेक्षिका जाधव मॅडम यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. तसेच वि. जे पुजारी सरांनी सुद्धा विद्यार्थ्यांना प्रस्तावनेत मांडताना म्हणाले की डॉ .बाबासाहेबानी विज्ञानाच्या व शिक्षणाच्या जोरावर वर्ण व्यवस्था, जात व्यवस्था, रुढी परंपराना मूठमाती देऊन न्याय, समानता, बंधुत्वता व स्वातंत्र्य दिले. तसेच विद्यार्थ्याचे भाषण झाले. त्यावेळी महाविद्यालय चे विभाग प्रमुख प्रा.संतोष हत्ते ,प्रा. बसवंत गायकवाड, गवंडी सर,घुगरे सर, पाटील सर ,मठपती सर, गंगा सर रवी नीलगार , मोहन शिंदे ,व इतर शिक्षक शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापिका ,कर्मचारी वृंद यांच्या उपस्थित महापरिनिर्वाण दीन साजरा करण्यात आला.

## यश सिद्धी आजी–माजी सैनिक बहुऊद्देशीय वेल्फेअर असोसिएशनवतीने ६७ वा महापरिनिर्वाण दिनानिमित्त मानवंदना



मुंबईः यश सिद्धी आजी–माजी सैनिक बहुऊद्देशीय वेल्फेअर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य आणि राष्ट्रनिमति डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार महोत्सव समिती व सैनिक फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी मंदीर, दादर पासुन ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक चैत्यभूमी येथे माजी सैनिकांतर्फे सैनिक परिवार, पाल्य, धम्म बंधू –धम्म भगिनी व बालक यांच्यासह रॅली मार्चपास करत धम्म पताका, बाबासाहेबांचे अनमोल विचारांचे वैचारिक बॅनर हातात घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस मानवंदना देण्यात आले

मानवंदना देताना बाबासाहेब यांचा जयघोष व वैचारिक घोषणा देण्यात आल्या, महार रेजिमेंटचा जयघोष करण्यात आला, तथागतांच्या धम्माचा जयघोष करण्यात आला, संविधानाचा जयघोष करण्यात आला. भीमराव आंबेडकर परेड ला संबोधन केले त्यांचे महार रेजिमेंट प्रशिक्षण केद्रात डॉ.बाबसाहेब आंबेडकर स्मारक व पुतळा करण्याबाबत ची आठवण करून देत टीव्ही व मीडिया यांच्या कडून संदेश देण्यात आला आहे. महार रेजिमेंटचे महार गीत गाऊन मानवंदना कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

सदर कार्यक्रमाला उपस्थित यश सिद्धी आजी–माजी सैनिक बहुऊद्देशीय वेल्फेअर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष सुभेदार प्रदीप गायकवाड, उपाध्यक्ष शिवपुत्र घटकंबळे, सैनिक फेडरेशनचे ब्रिगेडियर सुधीर सावंत , प्रवक्ता डी एफ निंबाळकर, फ्लेचर पटेल महार रेजिमेंटचे माजी सैनिक, राजेन्द्रकुमार खोब्रागडे, अजित न्यायनिर्गुने, बुद्धा चव्हाण, सुभेदार संजय कांबळे, अशोक सावंत साहेब, संजय तांबे, आयु.सुभेदार दिलिप सावंत, आयु.संतोष मोरे साहेब, मिलिंद जाधव, रमेश कदम, रमेश पवार, संतोष हाटे साहेब आयु राजेंद्र कुमार खोब्रागडे, अजित न्यायनुर्गिने, निलेश कांबळे , सुभेदार साईनाथ भैसारे , माननीय प्रकाश मर्चंट , सोरटे , अनिल राजेंद्र पवार साहेब पोपट गायधन , सूर्यकांत मोहिते , बसवेश्र्वर १९७१ चे युद्धवीर प्रकाश महाडिक आणि सुधाकर कांबळे, इत्यादी मान्यवर सदर कार्यक्रमास त्यांचा परिवारांना एक अलग उमंग दाखवण्याचे कार्य केले आहे. महार रेजिमेंट सैनिकांनी शिस्त बद्ध व उत्कुष्ट रॅली काढून धम्माचा प्रचार प्रसार करण्यावर भर दिला. उपस्थित नागरिकांनी माजी सैनिकांची रॅली बघून भारावून गेले होते. सर्वांच्या तोंडुन शब्दच सुचत नव्हते असे सन्माननीय उदगार काढले. महापरीनिर्वाण दिन साजरा करण्यात यशस्वी झालेत .

## जगदगुरु पंचाचार्य प्रशालेत महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



अक्कलकोट/प्रतिनिधीः गौडगाव बु (ता. अक्कलकोट) येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्र्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ शिक्षक लाडप्पा शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले तर अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी होते.

यावेळी पोपट सोनकांबळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक वर्ग उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शिवपुत्र चोल्ले यांनी केले.

## जयपाल काणे यांची भारतीय जनता पार्टी जैन प्रकोष्ट कोल्हापूर जिल्हा अध्यक्षपदी निवड




टाकळीवाडी/नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील भारतीय जनता पार्टी टाकळीवाडी शाखा अध्यक्ष जयपाल काणे यांची जैन प्रकोष्ट कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्षपदी २०२२ साली निवड करण्यात आली होती. आपल्या कर्तुत्वाने तसेच भारतीय जनता पार्टी पक्षाशी एकनिष्ठ राहिल्यामुळे त्यांची निवड ५ डिसेंबर २०२३ रोजी जैन प्रकोष्ट कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष म्हणून त्यांची निवड करण्यात आली. कार्यकर्ता ते कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष या पदापर्यंत त्यांनी मजल मारलेली आहे. त्यांना निवडीचे पत्र माजी जिल्हा परिषद सदस्य तसेच भारतीय जनता पार्टी कोल्हापूर जिल्हाध्यक्ष राजवर्धन निंबाळकर सरकार यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी पदाधिकारी महावीर तकडे, जयपाल माणगावे, चंदूरे बिराजदार सर, सरचिटणीस विठ्ठल पाटील, आकाश मुल्ला, राहुल देसाई ,साने औरंग शेख तसेच अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या निवडीमुळे कोल्हापूर जिल्ह्यात त्यांचे कौतुक होत आहे.

## नळदुर्ग शहरात अनेक ठिकाणी महामानवाला अभिवादन




नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : भारत देशाला समता, स्वतंत्र्य, बंधुता आणी न्याय समानता आणी अखंडता दिली त्याच बरोबर समतावादी विचारांचा बौद्ध धम्म दिले या थोर महापुरुष परमपुज्य , बोधिसत्व , भारतरत्न डा.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाला नळदुर्ग शहरात अनेक ठिकाणी ६७ वा महापरीनिर्वाण दिना निमीत्त अभिवादन करण्यात आले

नळदुर्ग भिमनगर नालंदा बुद्ध विहार येथे एम एस ई बी चे ग्रामीण अभियंता चाफेकर व खंडागळे प्रा . पडीत गायकवाड यांच्या हस्ते तर नळदुर्ग बस स्थानका समोर डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात पपू सुरवसे विश्र्वास रणे किशोर कोंडिबा बनसोडे पपू कांबळे जीवन बनसोडे प्रदिप बनसोडे यांच्या हस्ते तर बुध्दनगर भागात जनार्धन रणे प्रतिष्ठाणच्या वतीने जि.प कन्या प्रशालाचे मुख्याध्यापक कमलाकर गायकवाड केंद्र प्रमुख सत्तेश्र्वर जाधव अनिता रणे सुमन गायकवार मता बनसोडे फुला बाई गुरव यांच्या हस्ते इंदिरानगर राजेंद्र बनसोडे अमित बनसोडे अमोल गायकवाड यांच्या हस्ते डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लीश मेडियम स्कुल मध्ये मुख्याध्यापिका कविता देशमुख – पाटील सर्व शिक्षकत्तेर कर्मचारी यांच्या हस्ते जि प कन्या प्रशाला मध्ये सर्व शिक्षक नळदुर्ग शहरात अनेक ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले भारतीय बौध्द महासभा यांच्या वतीने पंचाशिल ध्वज व डॉ बाबासाहेब आंबेडकराना समता सैनिक दलाचा सैनिक राजरत्न बाळू बनसोडे यांनी मानवंदना दिली

यावेळी बौध्दाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी सर्वाना पंचशिल दिले .कार्यक्रमाचे प्रस्ताविक सुत्रसंचलन दादासाहेब बनसोडे यांनी मानले